


सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

● वर्ष २४ वे ● अंक २७८ ● सोमवार दि.३ ऑगस्ट २०२६ ● नांदेड ● पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ ● पाने ४ ● किंमत १ रु.

## तीन राज्यांच्या पोटनिवडणुकीत भाजपला धक्का

### राष्ट्रीय अध्यक्षांच्या मतदारसंघात प्रशांत किशोरांचा विजय

### भाजप,काँग्रेस व जनसुराज्यला प्रत्येकी एक जागा



नवी दिल्ली: तीन राज्यांतील विधानसभा पोटनिवडणुकांच्या निकालात भाजपला मोठा धक्का बसला असून राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांच्या मतदारसंघ व भाजपचा बालेकिल्ला असलेल्या बिहारमध्ये बांकीपूर मतदारसंघात जनसुराज्य पक्षाचे अध्यक्ष तथा रणनितीकार प्रशांत किशोर यांनी भाजप उमेदवारा विरुद्ध विजय मिळविला आहे. या तीन जागांपैकी गुजरातमधील मांजलपूर मतदारसंघ भाजपने कायम राखला, मध्य प्रदेशातील दतिया मतदारसंघात काँग्रेसने विजय मिळवला.

बिहार, गुजरात आणि मध्य प्रदेशातील विधानसभा पोटनिवडणुकांचे निकाल सोमवारी जाहीर झाले. बिहारमधील बांकीपूर ही सर्वाधिक चर्चेची लढत ठरली. राजकीय रणनीतीकार म्हणून देशभरात ओळख असलेले प्रशांत किशोर यांनी थेट निवडणूक रिंगणात उतरून भाजपचे नीरज कुमार सिन्हा यांचा पराभव केला. अनेक **पान ४ वर**

## १० वीच्या विद्यार्थ्यावर दोन वर्गमित्रांनी केला चाकुने हल्ला

### असर्जन परिसरातील घटना

नांदेड/प्रतिनिधी-असर्जन येथील श्री शंकररावजी चव्हाण विद्यालयात दहावीच्या वर्गातील विद्यार्थ्यावर किरकोळ कारणावरुन दोन वर्गमित्रांनी चाकुने हल्ला करुन गंभीर जखमी केल्याची घटना आज सकाळी घडली आहे.

शंकररावजी चव्हाण विद्यालयात महावीर गोविंद धुमाळ (वय १६) रा. धुमाळवाडी व त्याचे वर्गमित्र युवराज बालाजी वाघमारे (वय १५)रा.कोटतिर्थ, ओमकार मुंजाजी कदम (वय १६) रा.थुगाव हे तीन विद्यार्थी दहावी वर्गात शिक्षण घेत आहेत. महावीर धुमाळ व ओमकार कदम व युवराज वाघमारे यांच्यात किरकोळ कारणावरुन वाद झाला होता. आज





(सोमवार) दि.३ ऑगस्ट रोजी सकाळी शाळेच्या आवारामध्ये तीघांमध्ये पुन्हा भांडण झाले. युवराज वाघमारे व ओमकार कदम यांनी शाळेजवळ असणाऱ्या गणेश मंदिराजवळ महावीर धुमाळ यास अडवून त्याच्यावर चाकुने हल्ला केला. गळ्यावर, पोटावर व इतर ठिकाणी चाकुने वार करुन गंभीर जखमी केले. जखमी महावीर धुमाळ यास तातडीने विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेमुळे शाळा व परिसरात खळबळ उडाली. घटनेची माहिती समजताच पोलीस निरिक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्यासह पोलीस अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलीसांनी युवराज बालाजी वाघमारे व ओमकार मुंजाजी कदम या दोघांना चाकुसह ताब्यात घेतले आहे.

## पूरग्रस्तांसाठी केंद्राकडून राज्याला ५०० कोटींचा निधी

### अमित शाह यांची घोषणा

मुंबई/प्रतिनिधी-महाराष्ट्रातील पूरग्रस्त भागांतील मदत व पुनर्वसन कार्याला गती देण्यासाठी केंद्र सरकारने राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (एसडीआरएफ) अंतर्गत ५०० कोटी रुपयांचा आगाऊ निधी मंजूर केला आहे. केंद्रीय गृहमंत्री तथा सहकार मंत्री अमित शाह यांनी या मदतीची घोषणा केली असून, राज्यातील पूरस्थितीचा सामना करण्यासाठी हा निधी महत्त्वाचा ठरणार असल्याचे सांगितले जात आहे.

या निर्णयाचे स्वागत करत शिवसेना राज्य प्रवक्ते अरुण सावंत यांनी केंद्र सरकार आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे जाहीर आभार मानले. नैसर्गिक आपत्तीच्या काळात केंद्राने कोणताही विलंब न करता आर्थिक मदत उपलब्ध करून दिल्यामुळे पूरग्रस्त नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे त्यांनी म्हटले.सावंत म्हणाले की, आपत्तीच्या काळात राजकारण करण्यापेक्षा सर्वपक्षीयांनी एकत्र येऊन पूरग्रस्तांच्या मदतीसाठी



काम करणे ही काळाची गरज आहे. केंद्र सरकारने तातडीने मदतीचा हात पुढे केला असून, या निर्णयाचे सर्व **पान ४ वर**

## 'जेन झी'ची संघाकडून गंभीर दखल; भागवतांचा ६ ऑगस्टला युवा संवाद

मुंबई/प्रतिनिधी-केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीवरून देशभरात विद्यार्थ्यांच्या आंदोलनाची चर्चा सुरू असतानाच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने नव्या पिढीशी थेट संवाद साधण्यावर भर दिला आहे. या पार्श्वभूमीवर सरसंघचालक डॉ. मोहन भागवत ६ ऑगस्ट रोजी मुंबईत 'जेनरेशन झी' आणि 'जेनरेशन अल्फा' या विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. यावेळी देशातील शंभर शहरांमधून २ हजार विद्यार्थी व युवक उपस्थित राहणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

वांद्रे-कुर्ला संकुल (बीकेसी) येथील नीता मुकेश



अंबानी सांस्कृतिक केंद्रात 'इंडियाज इंटरनॅशनल मूव्हमेंट टू युनायटेड नेशन्स'च्या १५ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित परिषदेत **पान ४ वर**




# ही कसली राजकीय संस्कृती?


**लोकशाहीमध्ये सत्ताधारी आणि विरोधक हे एका नाण्याच्या दोन बाजू मानले जातात. मतभेद असू शकतात, संघर्षही होऊ शकतो; परंतु संवादाची दारे कधीच बंद होता कामा नयेत. अलीकडील नीट पेपरफुटी प्रकरणानंतर देशातील राजकीय घडामोडींकडे पाहिले असता, मतभेदांना उत्तर म्हणून संवादाऐवजी आरोप-प्रत्यारोप, अविश्वास आणि राजकीय बहिष्काराचे वातावरण निर्माण होत असल्याचे दिसून येते. यामुळे भारतीय लोकशाहीतील संवादाची परंपरा धोक्यात येत असल्याची भावना सामान्य नागरिकांच्या मनात निर्माण होणे स्वाभाविक आहे. २०१४ नंतर देशातील मोठा तरूण वर्ग भारतीय जनता पक्ष आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामागे उभा राहिल्याचे चित्र अनेक निवडणुकांमधून दिसून आले. नोटबंदीमुळे रोजगारावर परिणाम झाला, कोरोना काळात विविध सरकारी उपक्रमांवर चर्चा झाली, तरीही मोठा तरुण वर्ग सरकारच्या पाठीशी असल्याचे चित्र कायम राहिले. मात्र, स्पर्धा परीक्षांमधील अनियमितता आणि विशेषतः नीट पेपरफुटीच्या घटनांनी विद्यार्थ्यांमध्ये असंतोष वाढवला. परीक्षा ही लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी निगडित बाब असताना वारंवार पेपरफुटीच्या घटना घडणे आणि त्यावर ठोस जबाबदारी निश्चित होत नसल्याने तरुणांच्या मनात नाराजी निर्माण झाली. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. त्यामागे कोणती राजकीय विचारसरणी आहे, कोणाचा पाठिंबा आहे, यापेक्षा त्यांच्या प्रश्नांचे गांभीर्य समजून घेणे अधिक आवश्यक होते. मात्र, आंदोलनकर्त्यांवर विविध प्रकारचे राजकीय आरोप करण्यात आले. त्यांना विरोधी पक्षांचे हस्तक, परदेशी शक्तींचे समर्थक किंवा इतर राजकीय विशेषणांनी हिणवण्याचा प्रयत्न झाला. कोणतेही आंदोलन सुरू झाले की, त्यामागे राजकीय कट शोधण्यापेक्षा त्यामागील कारणे समजून घेण्याची जबाबदारी सत्ताधाऱ्यांची असते. दुर्दैवाने, हा संवाद अपेक्षित प्रमाणात घडताना दिसला नाही. लोकशाहीची खरी ताकद विरोधी मतांचा आदर करण्यात असते. आंदोलनकर्त्यांशी चर्चा करून मार्ग काढण्याऐवजी संघर्षाची भूमिका घेतली गेली, तर त्याचा परिणाम समाजातील दरी वाढण्यात होतो. विद्यार्थ्यांचा रोष केवळ एका परीक्षेपुरता मर्यादित राहत नाही, तर तो संपूर्ण व्यवस्थेवरील विश्वासाला धक्का देतो. त्यामुळे अशा वेळी सरकारने अधिक संयम, संवेदनशीलता आणि संवादाची भूमिका घेणे आवश्यक असते. अलीकडेच शिवसेना (शिंदे गट) चे मंत्री संजय शिरसाट आणि आ.बच्चू कडू यांनी आंदोलनाशी संबंधित अभिजीत दिपके यांच्या कुटुंबीयांची भेट घेतल्यानंतर त्यावरूनही राजकीय वाद निर्माण झाला. एका आंदोलनकर्त्याच्या कुटुंबीयांची विचारपूस करणे किंवा संवाद साधणे हा लोकशाही प्रक्रियेचाच भाग मानला पाहिजे. परंतु त्यावरून मित्रपक्षांमध्येच नाराजी व्यक्त होणे, समज देण्याची मागणी होणे, हे राजकारणातील असहिष्णुतेचे लक्षण मानावे लागेल. विरोधी भूमिका घेतली म्हणून किंवा सरकारवर टीका केली म्हणून कोणाशीही संवाद साधू नये, अशी मानसिकता लोकशाहीसाठी हितावह ठरू शकत नाही.भारतीय राजकारणात मतभेद असूनही वैचारिक संवादाची समृद्ध परंपरा आहे. पंडित नेहरूंपासून अटलबिहारी वाजपेयींपर्यंत, विविध पक्षांचे नेते परस्परांवर कठोर टीका करत असतानाही वैयक्तिक संवाद कायम ठेवत. त्यातूनच अनेक राष्ट्रीय प्रश्नांवर सहमतीचे मार्ग निघाले. आज मात्र राजकीय विरोधक म्हणजे शत्रू आणि सरकारवर प्रश्न उपस्थित करणारा प्रत्येक नागरिक संशयित, अशी धोकादायक प्रवृत्ती वाढताना दिसत आहे. ही प्रवृत्ती लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांनाच आव्हान देणारी आहे.कोणत्याही लोकशाहीत सरकारला प्रश्न विचारणे हा नागरिकांचा अधिकार आहे आणि त्या प्रश्नांना उत्तर देणे ही सत्ताधाऱ्यांची जबाबदारी आहे. संवादाऐवजी संघर्ष, समन्वयाऐवजी संशय आणि टीकेला उत्तर देण्याऐवजी टीकाकारांनाच लक्ष्य करण्याची पद्धत जर वाढत गेली, तर लोकशाहीचे आरोग्य निश्चितच कमकुवत होईल. राजकारणाचा उद्देश विरोधकांना संपवणे नसून समाजातील प्रश्न सोडवणे हा असला पाहिजे. त्यामुळे सत्ताधारी असोत किंवा विरोधक, संवादाची परंपरा जपणे हीच खरी भारतीय राजकीय संस्कृती आहे. अन्यथा, ''ही कसली राजकीय संस्कृती?''हा प्रश्न अधिक तीव्रतेने जनमानसात घुमत राहील.**

# सालाना बरसी आणि संतांचे पावन स्मरण







संत बाबा निधानसिंघजी (१०८)



संत बाबा हरनामसिंघजी



संत बाबा आत्मासिंघजी मोनी



संत बाबा शीशासिंघजी कारसेवा वाले

गुरुद्वारा श्री लंगर साहिब ही नांदेडची एक समृद्ध अशी धार्मिक संस्था आहे. संतबाबा निधानसिंघजी यांनी स्थापन केलेल्या या धार्मिक संस्थेचे संचालन सध्या कारसेवेच्या माध्यमातून केले जात आहे. हजुरसाहिब, नांदेडच्या दर्शनासाठी पोहचणाऱ्या भविकांची चांगली सोय व्हावी असे मुख्य उद्दीष्ट असले तरी गुरुद्वारा लंगरसाहिब ट्रस्ट आपात परिस्थितीत नेहमीच नांदेडकरांच्या मदतीसाठी धावून येते. नांदेडच्या पावनभूमित मागील एका शतकाहुन अधिक काळ गुरुद्वारा श्री लंगर साहिब संस्था वाटचाल करीत आहे. तत्कालीन संत मंडळीच्या कार्यांचा स्मरण व्हावा म्हणून गुरुद्वारा श्री लंगर साहिब मध्ये दर वर्षी दि.४ ऑगस्ट रोजी श्रद्धाभावाने चार संतांच्या स्मरणार्थ सालाना बरसी साजरी करण्यात येते.

सालाना बरसी समगम आता देशपातळीवर नावलौकिक झालेले एक मोठे कार्यक्रम म्हणून ओळखले जाते. यावर्षी गुरुद्वारा श्री लंगरसाहिब अंतर्गत रत्नागिरी जवळ बांधण्यात आलेल्या गुरुद्वारा रतनगढ साहिब नावाच्या गुरुद्वाराच्या नवीन वास्तुचे लोकार्पण करण्यात आले आहे. याची गणना देखील एक उत्कृष्ट उपक्रम म्हणून केली जाईल यात शंका नाही. गुरुद्वारा श्री लंगर साहिब ट्रस्ट संतबाबा निधानसिंघजी संस्थेचे मुखी संतबाबा नरिंदरसिंघजी करसेवावाले आणी मुखी संतबाबा बलविंदरसिंघजी करसेवावाले यांच्या नेतृत्वात होत असलेले सेवाकार्य नांदेडसाठी एक पर्वणीच होय. प्रतिदिन हजारों भाविकांसोबत गारजूँ लोकांना अन्नदान करण्याचे गुरुद्वाराचे उपक्रम शीख धर्म तत्त्वाँशी सुसंगत असे आहे.

यावर्षी संत बाबा निधानसिंघजी यांची ७९ वीं बरसी (स्मरण दिवस) साजरी होत आहे. सन १९४८ पासून दिवंगत संताच्या स्मरणार्थ येथे सालाना बरसी समगम दरवर्षी साजरा केला जातो आहे. संत बाबा निधानसिंघजी यांनी त्यांच्या हयातीत गुरुद्वारा श्री लंगर साहिबची स्थापना केली होती. जवळपास पस्तीस वर्षे गुरुद्वाराचे संचालन त्यांनी केले. गोदावरी नदीकाठी त्यांनी भाविकांची सोय व्हावी म्हणून लंगरसेवा सुरु केली होती. विपरीत आर्थिक परिस्थिती आणी कमी प्रमाणात मनुष्यबळाचा सामना करीत त्यांनी तेव्हा सेवेची प्रथा सुरु केली. झोळीत उकळलेले चने ठेवून एक मुट्ठभर चने ते लंगर म्हणून वाटायचे. नंतर त्यांनी परिश्रमाने लंगर सेवा सुरु केली आणी विस्तारली. संतबाबा निधानसिंघजी यांनी दिनांक ४ ऑगस्ट सन १९४७ रोजी जगाचा निरोप घेतला. त्यांनी सुरु केलेल्या सेवेची जवाबदारी संतबाबा हरनामसिंघजी यांच्यावर सोपवली गेली.

संतबाबा हरनामसिंघजी यांनी गादी सांभाळल्यानंतर सामाजिक उपक्रमांची सुरुवात केली. त्यांनी अनेक सैक्षणिक उपक्रम राबविले. शहरातील काही शाळा





संचालनासाठी तन मन धन या भावनेने भरीव योगदान दिले. नांदेडमध्ये श्री गुरु गोबिंदसिंघजी अभियांत्रिकी महाविद्यालयाची स्थापना व्हावी म्हणून विष्णुपुरीत ३५ ते ४० एकर जागा आणी ईमारत उभी करण्यासाठी लक्षावदी रुपयांचे दान दिले. त्यामुळे आज एक अटोनोमसस्तरीय अभियांत्रिकी महाविद्यालय आपल्याकडे आहे. त्या योगदानाच्या मोबदल्यात शासनाने गुरुद्वारा लंगर साहिब ट्रस्टला प्रवेश प्रक्रियेत संचालक कोटा देण्याचा निर्णय घेतला आणी तो अमलात ही आहे. गुरुद्वारा लंगर साहिब संचालकाच्या भूमिकेत आहे किंव्हा होते पण आज शासनाने आणी अभियांत्रिकी महाविद्यालय प्रशासनाने गुरुद्वारा श्री लंगर साहिब यांना त्यांच्या हक्कापासून वंचित करण्याचे कारस्थान केलेले आहे.

स.रविन्द्रसिंघ मोदी
वरिष्ठ पत्रकार,नांदेड

संतबाबा हरनामसिंघजी यांनी नांदेडच्या अनेक शिक्षण संस्थाँना सढळ हाताने आर्थिक मदत केली होती. त्यांनी आरोग्य सेवेसाठीही मोठे योगदान दिलेले आहेत. त्यांच्या स्मरणार्थ आज ४७ वीं बरसी आयोजित आहे.

संत बाबा हरनामसिंघजी यांच्यानंतर गादीवर संतबाबा आत्मासिंघजी मोनी यांनी कार्य सुरु केलं. त्यांनी गुरुद्वारा श्री लंगर साहिब यात्री निवासाच्या विस्ताराकडे लक्ष केंद्रित केलं. त्यांना सेवेसाठी अधिक काळ मिळाला नाही पण आजार आवस्थेत देखील सेवा सांभाळली . सन १९८३ मध्ये त्यांना देवज्ञा झाली. त्यांच्या जागी कारसेवेची परंपरा असलेले संतबाबा शीशासिंघजी यांनी गुरुद्वारा श्री लंगरसाहिबचे मुखी म्हणून जवाबदारी स्वीकारली. संतबाबा आत्मासिंघजी मोनी यांची आज ४३ सालाना बरसी आहे.संतबाबा शीशासिंघजी करसेवावाले यांनी नांदेडमध्ये काही एतेहासिक गुरुद्वारा परिसरात वास्तु निर्माणसेवा सुरु केली. सोबतच गुरुद्वारा श्री लंगर साहिब परिसराच्या विस्तारास त्यांनी सुरुवात केली. गुरुद्वारा भोवतालच्या जमीनी विकत घेऊन त्यांनी मोठ्या आकराच्या यात्री भवनांचे निर्माण सुरु करण्याची योजना अमलात आणली. या कार्यात संत बाबा नरिंदरसिंघजी कारसेवा वाले आणी संत बाबा बलविंदरसिंघजी कारसेवावाले यांची मोलाची सेवा आणी सहकार्य लाभले. म्हणून आज एका सेवा-साम्राज्याचे निर्माण नांदेड मध्ये पहायला मिळत आहे. संतबाबा शीशासिंघजी यांनी वर्ष २००५ मध्ये जगाचा निरोप घेतला. आज त्यांची २१ वीं सालाना बरसी आहे.

संतबाबा शीशासिंघजी यांच्या गादीवर वारस म्हणून संतबाबा नरिंदरसिंघजी आणी संत बाबा बलविंदरसिंघजी मागील दोन दशकाहुन अधिक काळ सेवा देत आहेत. त्यांच्या नेतृत्वात गुरुद्वारा श्री लंगर साहिबची कीर्ति सातासमुद्रा पलीकडे विस्तारली गेली. नांदेड मध्ये बहुमंजिली यात्री भवनांचे निर्माण त्यांच्यामुळे झाले. त्यांनी सेवाभाव जपत नांदेड शहराला हरित करण्यासाठी ग्रीन सिटी योजना राबवली. सन २०२० मध्ये उद्धवलेल्या कोविड संक्रमण काळात त्यांनी अन्नदानाची भव्य सेवा सातत्याने केली आणी अनेक दिवसं सतत केली. लॉकडाउन काळात गुरुद्वाराच्या माध्यमातून त्यांनी रोज लाखों नांदेडकरांसाठी घरपोच लंगरसेवा उपलब्ध करुन दिली होते हे नांदेडकरांच्या नेहमी स्मरणात राहिल. पण त्यांच्या सेवेची कोणतीच दखल शासनाने किंव्हा लोकप्रतिनिधीनीं घेतली नाही याचे खंत मनाशी राहिल. दोन्ही बाबाजींनीं केलेली सेवा आणी योगदान कायमचे लक्ष्यात राहिल. आज सालाना बरसी निमित्त सर्व थोर संतमंडळीचे स्मरण आणी प्रणाम!

# सरकारचे ईपीएस-९५ पेंशन धारकांवरील दुर्लक्ष म्हणजे जेष्ठ नागरिकांची खुली थट्टाच!

२०१४ पासुन ईपीएस पेंशन धारक फक्त जगण्याइतकी इतकी पेन्शनची मागणी करीत आहे.परंतु सरकार प्रत्येक अधिवेशनात डोळे बंद करून फक्त तमाशा पहात आहे.जेष्ठ नागरिक ईपीएस पेंशन धारक कमीत कमी ७५०० पेंशन व महागाई भत्ता मिळावा यासाठी वृध्दापकाळात सुध्दा संघर्ष करीत आहे.परंतु सरकारच्या नाकावरील माशी सुद्धा उडतांना दिसत नाही हे जेष्ठांच्या प्रती दुर्भाग्य म्हणावे लागेल.सरकार निवडणुकीच्या काळात मतदारांना लॉलीपॉप देवून अनेक मोफत योजना अंमलात आणते.परंतु देशाचा शिल्पकार कामगार वर्ग फक्त जगण्याइतकी पेन्शनची मागणी करते तेव्हा सरकार प्रत्येक अधिवेशनात पाठ फिरवितांना दिसते.देशात वाढती महागाई,वाढता औषधोपचार, वाढते कर आणि वाढत्या प्रदूषणामुळे



वृध्दापकाळातील ढासळते आरोग्य यांनी ईपीएस-९५ पेंशन धारक अत्यंत त्रासलेला असुन ग्रस्त आहे.कारण अल्पशा पेंशनमध्ये पेन्शन धारक कोणतेही काम पूर्ण करूच शकत नाही.यावर सरकारने कानांवर हात ठेवले आहे व तोंडावर बोट ठेवले आहे यावरून स्पष्ट होते की, सरकारला ईपीएस ९५ पेंशन धारकांशी काहीही देणेघेणे नाही.त्यामुळे सरकारला विनंती आहे की,आपण जर या गंभीर समस्येवर तोडगा काढूच शकत नसेल तर स्वेच्छा मरणाची परवानगी दिली पाहिजे.याचे स्वागत आम्ही ईपीएस पेंशन धारक आनंदाने करू.

गेल्या १२ वर्षांपासून ईपीएस पेंशन धारक मिनिमम (कमीत कमी) पेंशनची मागणी करीत आहे.या उद्देशाने कमीत कमी जगण्याइतकी तरी पेन्शन जाहीर करावी अशी पेंशनधारकांची केंद्र सरकारकडे अनेक वर्षांपासून मागणी करीत आहे.यावर लोकसभेत व राज्यसभेत अनेक खासदारांनी प्रश्न सुध्दा उपस्थित केले.सोबतच देशातील अनेक संघटनांनी मंत्री,खासदार,आमदार, प्रशासकीय विभाग यांना निवेदनाच्या माध्यमातून सरकारपर्यत आपले प्रश्न मांडण्याचे काम केले.त्यामुळे या पावसाळी अधिवेशनात सरकारच्या माध्यमातून ईपीएस-९५ बद्दल ठोस निर्णय घेऊन पेंशन धारकांना दिलासा देईल अशी आशा देशातील करोडो वृध्द पेंशन धारकांना वाटत होती.परंतु याही पावसाळी अधिवेशनात ईपीएस-९५ पेंशन धारकांच्या पदरी निराशाच आली ही अत्यंत दुःखद आणि चिंताजनक बाब आहे.अनेक वर्षांपासून पेंशन धारकांचा संघर्ष सुरूच आहे.लोकसभा निवडणुकीच्या आधी ईपीएस पेंशन धारकांबद्दल सरकारकडुन चांगली बातमी येण्याचे संकेत होते.परंतु सरकारने पेंशन धारकांच्या पदरी फक्त निराशा दिली.याचे दुःख करोडो वयोवृद्ध पेंशन धारकांना झाले.तरीही जगण्याइतकी पेंशन दिली पाहिजे याबद्दल अजून पर्यंत सरकारला जाग आलेला नाही.ईपीएस-९५ पेंशनचा मुद्दा कोणत्याही एका पक्षाचा,संघटनेचा किंव्हा संस्थेचा नसुन सार्वजनिक आहे.केंद्र सरकार मोठमोठ्या गोष्टी करत आहेत परंतु वृध्दांकडे पुर्णतः दुर्लक्ष करीत आहे.ईपीएस-९५ पेंशन धारकांना न्याय मिळेल या आशेने आतापर्यंत उम्मीद टीकुन होती.परंतु सरकार मिनिमम पेंशन बद्दल एकही शब्द बोलायला तयार नाही ही अत्यंत गंभीर बाब आहे. ईपीएस-९५ पेन्शन बद्दल सरकार सोबत,मंत्र्यांसोबत व अनेक खासदारांसोबत चर्चा होवून सुध्दा सरकार पेन्शन धारकांवर अन्याय करतांना दिसते याचे जिवंत उदाहरण या पावसाळी अधिवेशनात दिसून आले.आज देशातील करोडो ईपीएस-९५ पेन्शन धारकांना कमीत कमी १००० व जास्तीत जास्त ३००० रूपयापर्यंत पेन्शन मिळत असल्यामुळे त्यांचा उदरनिर्वाह होणे अत्यंत कठीण झाले आहे.सरकार महागाई वाढवीते तेव्हा कोणाचाही विचार न करता भरमसाठ महागाई वाढविते आणि ईपीएस पेंशन धारक फक्त ७५०० रूपये पेन्शन मागते तेव्हा सरकार पाठ फिरविते ही कुठली लोकशाही म्हणावी.आज सरकारने महागाईचा मोठा डोंगर उभा केला आहे यात सर्वसामान्य व पेंशन धारक दबलेला आहे.यामुळे अल्पशा पेन्शनमध्ये पेन्शन धारक जगुही शकत नाही आणि मरूही शकत नाही.कारण खाण्यापिण्याचा खर्च, इलेक्ट्रीक बिल, पाण्याचे बिल, घरटॅक्स, वाढती महागाई, वयानुसार औषधोपचार इत्यादी अती आवश्यक सेवा १००० किंव्हा ३००० रूपयात कशाकाय पुर्ण होणार? हे गांभीर्य सरकारला का दिसत नाही? सरकार एवढी निर्लज्ज का झाली? पेंशन धारकांची मागणी होती की, कमीत कमी ७ हजार ५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता व वैद्यकीय सुविधा मिळावी. परंतु वित्त मंत्री निर्मला सिताराम यांनी संपूर्ण ईपीएस-९५ पेंशन धारकांना निराश केल्याचे स्पष्ट दिसून येते आहे.ईपीएस पेन्शन धारकांचा मुद्दा अत्यंत गंभीर, महत्त्वाचा आणि ज्वलंत असल्याचे मी समजतो. हा ज्वलंत मुद्दा असल्याने याची दखल केंद्र सरकारने या पावसाळी अधिवेशनात घेणे गरजेचे होते. परंतु सरकारने याला यत्किंचितही महत्व दिले नाही ही अत्यंत दुःखद बाब आहे. वृद्धांच्या अडीअडचणी पाहून ईपीएस-१९९५ पेन्शन धारकांचा प्रश्न मार्गी लावायला पाहिजे होता परंतु सरकारने पेंशन धारकांना निराश केले.केंद्र सरकारने आतापर्यंत करोडो ईपीएस पेन्शन धारकांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केले. तरीही ६० ते ८० वर्षाच्या म्हाताऱ्या पेन्शन धारकांनी आतापर्यंत शांततेने आंदोलन केले आणि करीत आहे व जगण्याइतकी पेंशनच्या मागणीची आस लावून बसले होते. कारण पेन्शन ही त्यांच्या म्हारपणाची शीदोरी आहे. त्यामुळे पेन्शन हे जीवन-मरणाचे साधन सुध्दा आहे. याबाबदची सुध्दा सरकारने जान ठेवली नाही. सरकारने पेन्शन धारकांचा अंत न पाहता कोणत्याही योजनेअंतर्गत कमीत कमी ७५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता आणि वैद्यकीय सुविधा ताबडतोब लागु करण्याचा निर्णय आतातरी घ्यावा.आता पेन्शन धारकांच्या प्रश्नावर अंतिम निर्णय घेण्याची वेळ आली आहे.देशात अनेक कठीण प्रश्न आहेत यात दुमत नाही आणि सरकार यावर नेहमी तोडगा काढण्याचा प्रयत्न करीत असते.परंतु आज १४५ कोटी जनता व राजकीय पुढारी उघडल्या डोळ्यांनी करोडो पेन्शन धारकांच्या वेदना पाहात आहे व दिसत आहे.परंतु सरकार ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या बाबतीत चेहऱ्यावर पांघरूण घेऊन बसले आहे.सरकारच्या तिजोरीत कामगारांच्या घामाचा अरबो रूपया सरकारजवळ आहे हा पैसा सरकार लोकप्रतिनिधीच्या पगारासाठी,पेन्शनसाठी व इतरत्र वापरत असतो. परंतु सरकार कामगारांना पेन्शन देवतांना भिक दील्यासारखी पेंशन देत आहे. ही लोकशाहीला काळीमा फासणारी व घृणास्पद बाब आहे.याचे दुःख आपल्या पुर्वजांना सुध्दा होत असावे.राजकीय पुढाऱ्यांचे वाढीव पगार,इतर भत्ते व पेन्शन सुरळीत सुरू असतात व सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार वाढले की राजकीय पुढाऱ्यांचे पगार व पेंशन वाढतात याला काय म्हणावे?पेंशन धारकांच्या या घटनेवरून असे दिसुन येते की सरकारने पेन्शन धारकांना वाऱ्यावर सोडले की काय असे वाटत आहे. केंद्र सरकार पेन्शन धारकांना वाचवीण्यापेक्षा वाऱ्यावर सोडल्याचे काम करीत आहे. परंतु आताही वेळ गेलेली नाही देर आज दुरूस्त आए ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या मागणीवर सरकारने गांभीर्याने विचार करून अवश्य अंतीम निर्णय घेवून पेन्शन धारकांना दीलासा देवुन त्यांचा मार्ग मोकळा करावा. कारण ईपीएस-९५ पेन्शन धारक प्रत्येक अधिवेशनात पेन्शन वाढण्याची वाट पाहत असतो.परंतु नेहमी त्यांच्या नशिबी नीराशा लागते. ईपीएस पेन्शन धारकांनी गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत अनेक आंदोलने करून रस्त्यावर उतरले.तरीही सरकारचे डोळे उघडले नाही. म्हणजेच केंद्र सरकार ईपीएस-१९९५ पेन्शन धारकांबद्दल उदासीन असल्याचे दिसून येते. पावसाळी अधिवेशनात अर्थमंत्री निर्मला सीतारामन ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या जखमेवर फुंकर घालेल असे वाटत होते.परंतु सरकारने पेन्शन धारकांना वाऱ्यावर सोडले व निराशा हाती आली. ईपीएफओ चा पैसा हा राज्य सरकारच्या माध्यमातून केंद्रात जात असतो. त्यामुळे ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांना न्याय देण्याचे काम व दायीत्व केंद्र सरकारचे असते तेवढेच राज्य सरकारचे सुध्दा असते. कारण देशाच्या विकासाकरिता संपूर्ण पैसा हा राज्य सरकारच्या तिजोरीतुन केंद्रात जात असतो. त्यामुळे कामगार व कर्मचाऱ्यांचा ईपीएफओने घेतलेला पैसा गेला कुठे? असाही प्रश्न करोडो पेन्शन धारकांपुढे उपस्थित होतो.त्यामुळे प्रत्येक राज्यातील कामगार व कर्मचारी विचारत आहे की पेन्शन करीता कापलेला पैसा गेला कुठे? ईपीएस १९९५ चे पेन्शन धारक आपल्या हक्काचा पैसा पेन्शनच्या स्वरूपात सरकारला मागत आहे.परंतु सरकार यावर मात्र मौन धारण केल्याचे दिसून येते. म्हणजेच आज पेन्शन धारकांची परीस्थिती अशी झाली आहे की आपलाच पैसा आपणच चोर. त्यामुळे ईपीएस १९९५ च्या पेन्शन धारकांसमोर प्रश्न आहे की जगावे की मरावेअशी गंभीर परिस्थिती आज ईपीएस पेन्शन धारकांची झाली आहे.त्यामुळे सरकारने ईपीएस पेन्शन धारकांना कमीत कमी ७५०० रूपये पेन्शन, महागाई भत्ता व इतर सुविधा लागू करून पेन्शन धारकांना योग्य न्याय सरकारने द्यावा. पेंशनधारक आशावादी आहेत. त्यामुळे पेन्शन धारकांना विश्वास आहे की ईपीएस-९५ पेन्शन धारकांचा प्रश्न अवश्य सुटेल.पेंशन धारकांची ही लढाई अंतिम आहे. ईपीएस पेन्शन धारक चिंतेने मरत आहे, महागाई वाढत आहे, आर्थिक परिस्थिती नाजूक होत आहे.सुप्रिम कोर्टाचेही म्हणने आहे की ईपीएस पेन्शन धारकांना मीळणारी पेन्शन ही तुटपुंजी आहे.त्यामुळे जगण्याइतकी पेन्शन मिळायलाच पाहिजे. शेतकरी हा ज्याप्रमाने देशाचा अन्नदाता आहे त्याचप्रमाणे देशाचा कामगार हा शिल्पकार आहे याची जाण केंद्र सरकारने ठेवली पाहिजे.राजकीय पुढारी मोठ्या ऐटीने सांगतात की समान हक्क,समान न्याय, समान अधिकार मग ईपीएस पेन्शन धारकांच्या पेन्शनमध्ये व राजकीय पुढाऱ्यांच्या पेन्शन, पगार यात तफावत का? असाही प्रश्न सर्वसामान्यांसमोर उपस्थित होतो.केंद्र सरकारने ज्याप्रमाणे आठव्या वेतन आयोग स्थापनेला मंजुरी दिली.त्याचप्रमाणे ईपीएस-९५ पेंशन बद्दल सरकारने ठोस निर्णय घेतला पाहिजे. मी केंद्र सरकारला विनंती करतो की आपण अनेक योजना अंमलात आणल्यात त्याचे मनापासून स्वागत.परंतु २०१४ पासून प्रलंबित असलेला व लोकसभेत पक्ष-विपक्षाच्या अनेकदा खासदारांनी उचललेला ईपीएस-९५ चा पेंशनचा मुद्दाला गांभीर्याने घेऊन कमीत कमी ७५०० रूपये पेंशन जाहिर करून अवश्य मार्गी लावेल अशी आशा देशाच्या करोडो पेंशन धारकांना आहे.सरकारला यावर काहीच निर्णय घ्यायचा नसेल तर ईपीएस पेंशन धारकांना सरकारने स्वेच्छा मरणाची परवानगी द्यावी याचेही आम्ही स्वागत करू.जय हिंद!जय भारत.

रमेश लांजेवार
नागपूर

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# हदगावच्या विकास निधीवर प्रश्नचिन्ह;१५ कोटींचा निधी सा.बां.विभागाकडे वर्ग

हदगाव/प्रतिनिधी-हदगाव शहरातील विविध विकासकामांसाठी मंजूर झालेला सुमारे १५ कोटी रुपयांचा निधी नगर परिषदेकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या निर्णयामुळे शहराच्या राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. नगर परिषदेकडे विकासकामे राबविण्यासाठी आवश्यक यंत्रणा व मनुष्यबळ उपलब्ध असताना हा निधी नेमका कोणाच्या सूचनेवरून आणि कोणत्या कारणास्तव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आला, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

हदगाव नगर परिषदेवर शिवसेना (शिंदे) व भाजपची सत्ता आहे. नगराध्यक्षा ह्या शिवसेनेच्या रोहिणी वानखेडे ह्या आहेत. नगरपरिषदेवर शिवसेनेची सत्ता असतांना शासनाकडून निधी मंजूर केला जातो. परंतु सदरील कामे न.पा.प्रशासनामार्फत न करता सा.बां. विभागाकडे वर्ग करुन केली जात आहेत. विकासकामे करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सक्षम असताना निधी इतर विभागाकडे वर्ग करण्याची गरज काय होती? नगर परिषदेकडे अशी कामे करण्याची क्षमता नाही का? अशा प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने जाहीरपणे द्यावीत, अशी मागणी होत आहे.या पार्श्वभूमीवर ४ ऑगस्ट २०२६ रोजी होणाऱ्या हदगाव नगर परिषदेच्या विशेष सर्वसाधारण सभेत हा मुद्दा गाजण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. नगरसेवक प्रशासनाला याबाबत जाब विचारणार का, तसेच निधी वर्ग करण्यामागील कारणांची माहिती सभागृहात मागणार का, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, शहरात सध्या कोट्यवधी रुपयांच्या रस्ते विकासाची कामे सुरू आहेत. मात्र, काही ठिकाणी शासकीय कंत्राटदारांच्या नावावर प्रत्यक्षात राजकीय व्यक्तींच्या निकटवर्तीयांकडून कामे केली जात असल्याची चर्चा रंगली आहे. राजकीय दबावाच्या जोरावर विविध प्रभागांतील निकृष्ट दर्जाच्या रस्ते कामांची बिले मंजूर होत असल्याची माहितीही पुढे येत आहे.विशेष म्हणजे अनेक विकासकामांच्या ठिकाणी शासनाच्या नियमानुसार कामाचा तपशील, मंजूर खर्च, कंत्राटदाराचे नाव, कामाचा कालावधी व संबंधित माहिती दर्शविणारे फलकच लावण्यात आलेले नाहीत, अशी नागरिकांची तक्रार आहे. या तक्रारींकडे संबंधित यंत्रणेकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही केला जात आहे.काही रस्त्यांच्या कामांबाबत निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले जात असल्याच्या तक्रारी असून, कामांची गुणवत्ता, तांत्रिक निकष आणि देखरेख यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. या कामांवर देखरेख करणारा जबाबदार अधिकारी कोण, तसेच गुणवत्ता नियंत्रणासाठी कोणती उपाययोजना केली जात आहे, याबाबतही नागरिक स्पष्टीकरणाची मागणी करत आहेत.या सर्व घडामोडींमुळे हदगाव शहरातील विकासकामांच्या पारदर्शकतेवर प्रश्न निर्माण झाले आहेत. नगराध्यक्ष, मुख्याधिकारी आणि नगर परिषद प्रशासन निधी वर्ग करण्यामागील वस्तुस्थिती जनतेसमोर मांडणार का? तसेच सुरू असलेल्या विकासकामांच्या गुणवत्तेबाबत ठोस भूमिका घेणार का? याकडे आता संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे. ४ ऑगस्टच्या विशेष सर्वसाधारण सभेत या प्रश्नांवर नेमकी कोणती चर्चा होते आणि प्रशासनाकडून काय भूमिका मांडली जाते, याची उत्सुकता नागरिकांमध्ये आहे.

# दर्जेदार नाट्य महोत्सवांचे सातत्य कायम राहावे-महापौर कविता मुळे



नांदेड/प्रतिनिधी-संस्कृती मंत्रालय, भारत सरकार आणि स्वप्नरंग सांस्कृतिक संस्था, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्वप्नरंग नाट्य महोत्सवाचे उद्घाटन रविवारी डॉ. शंकरराव चव्हाण सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. यावेळी अध्यक्षस्थानावरून बोलताना महापौर कविता मुळे यांनी नांदेडमध्ये अशा दर्जेदार नाट्य महोत्सवांचे सातत्य कायम राहावे, अशी अपेक्षा व्यक्त करत स्वप्नरंग सांस्कृतिक संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. तसेच संस्थेच्या पाठीशी महानगरपालिका व स्वतःचे सहकार्य कायम राहील, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. विजयकुमार माहुरे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व नटराज पूजन करून महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर कविता मुळे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून उपमहापौर दीपकसिंग रावत, महानगरपालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, ज्येष्ठ रंगकर्मी राजीव किवळेकर, लक्ष्मण संगेवार आणि डॉ. राम चव्हाण उपस्थित होते. प्रास्ताविकात स्वप्नरंग सांस्कृतिक संस्थेचे अध्यक्ष दिनेश कवडे यांनी महोत्सवामागील भूमिका, उद्देश आणि भविष्यातील वाटचालीची माहिती दिली. नाट्यकलेचे संवर्धन आणि विविध भागांतील रंगकर्मी एकत्र आणण्यासाठी अशा महोत्सवांची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. महानगरपालिका आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे यांनी अशा सांस्कृतिक उपक्रमांना महानगर-पालिकेचे सहकार्य कायम राहील, अशी ग्वाही दिली. उपमहापौर दीपकसिंग रावत यांनी हा महोत्सव दरवर्षी आयोजित व्हावा आणि मराठवाड्यातील कलावंतांचा अधिकाधिक सहभाग असावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.उद्घाटक डॉ. विजयकुमार माहुरे यांनी नांदेडची रंगभूमी अधिक गतिमान करण्यासाठी अशा नाट्य महोत्सवांची नितांत गरज असल्याचे सांगितले. शासनाने सातत्याने कलावंतांच्या पाठीशी उभे राहून अशा उपक्रमांना प्रोत्साहन द्यावे, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी स्वप्नरंग नाट्य प्रशिक्षण कार्यशाळा यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. उद्घाटनानंतर माणूस फाऊंडेशन, मुंबई प्रस्तुत डॉ. सोमनाथ सोनवलकर लिखित व दिग्दर्शित अलेक्झांडर व्हाया डायोजेनिस या दर्जेदार मराठी नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला.

# जुगार खेळणाऱ्या पाच प्रतिष्ठितांना अटक




नांदेड/प्रतिनिधी-शहरातील झुलेलाल मंदिर भवन मधील खोली क्र.३०९ मध्ये सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर वजिराबाद पोलीसांनी रविवारी सायंकाळी धाड टाकुन पाच प्रतिष्ठित नागरिकांना अटक केली. त्यांच्याकडून ३ लाख ५५ हजार रुपयांचा ऐवज पोलीसांनी जप्त केला आहे.

झुलेलाल मंदिर भवन मधील एका खोलीत जुगार सुरु असल्याची माहिती वजिराबाद पोलीसांना मिळाली. सपोनी लोंढे, फौजदार सुनील बुलंगे व पोलीस कर्मचाऱ्यांनी रविवारी सायंकाळी खोली क्र.३०९ वर छापा टाकला. पैसे लावून तिर्रट नावाचा जुगार खेळत असतांना रवी पेगाजी गवळे (वय ४१), विकास रामराव सरपोद (वय ३५) रा. गुरुवार बाजार सिडको,नांदेड, मुकेश पांडूरंग लोळंगे (वय ३६) रा. भोजालाल गवळी चौक,नांदेड, चंद्रशेखर गणपतराव पवार (वय ३३) रा.सिडको, नांदेड, अतुल भगवानराव आडे (वय ३७) रा.गुरुवार बाजार, सिडको, नांदेड या पाच जणांना रंगेहाथ पकडण्यात आले. त्यांच्याकडून पोलीसांनी रोख २५ हजार रुपये, पाच मोबाईल, चार दुचाकी वाहने असा ३ लाख ५५ हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला. या प्रकरणी पाच जणांविरुध्द वजिराबाद पोलीस ठाण्यात मुंबई जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आदिवासी गर्भवतीच्या मृत्यूची उच्चस्तरीय चौकशी करा

## आ.भीमराव केरामांची आरोग्यमंत्र्यांकडे मागणी



किनवट/प्रतिनिधी-लोखंडवाडी येथील सौ.कल्पना चंपत ढोले (वय २३) या आदिवासी गर्भवती महिलेच्या मृत्यू प्रकरणी आ.भीमराव केरामांनी गंभीर दखल घेतली असून, या प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करून दोषींविरुद्ध कठोर कारवाई करावी, अशा आशयाचे निवेदन सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे सोपवले आहे. तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तात्काळ दखल घेऊन कारवाई करणे अपेक्षित आहे. आ.केरामांनी आरोग्य विभागाची स्वतंत्र आढावा बैठक घेऊन आरोग्य सेवा सुरुळीत करण्यासाठी प्रथमोपचार केल्याशिवाय आरोग्य सेवा सुरुळीत होणार नसल्याच्या तीव्र प्रतिक्रिया ऐकायला मिळताहेत.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर नांदेड जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांचे जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेवर प्रभावी नियंत्रण राहिलेले नाही हे अगदी सुस्पष्ट आहे. दुर्गम व आदिवासी भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी आणि आरोग्य सेवांवर आवश्यक देखरेख शिवाय समन्वयाचा अभाव असल्यामुळे अशा गंभीर घटना घडत असल्याची खंत आ.केराम यांनी निवेदनात व्यक्त केली.गर्भवती महिलांना वेळेवर उपचार, तज्ज्ञ डॉक्टर, रुग्णवाहिका आणि आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध होत नसल्याने आदिवासी भागातील माता व बालकांना जीव गमवावा लागू नये याची खबरदारी घेणे काळाची गरज आहे. लोखंडवाडीतील सौ.कल्पना ढोले या गर्भवतीला आणि बाळाला जीव गमवावा लागला. या प्रकरणी तात्काळ व निष्पक्ष चौकशी करून जबाबदार यंत्रणेविरुद्ध कठोर कारवाई करुन मृत महिलेच्या कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत देण्याची मागणी आ.केरामांनी केली आहे. आदिवासी भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांमध्ये डॉक्टर, परिचारिका, औषधसाठा, रुग्णवाहिका आणि प्रसूतीसाठी आवश्यक सुविधा कायमस्वरूपी उपलब्ध करून आरोग्य व्यवस्था सक्षम करण्यात यावी, अशीही मागणी आ.केराम यांनी केली. मुळात सौ.कल्पना ढोले यांच्या प्रसुती काळात आशावर्कर, आरोग्य सेविका यांनी पावलोपावली दखल घेतली का?, दरम्यान त्या गर्भवती मातेला नियमित सकस आहार मिळाला होता का? हा एक चौकशीचा भाग असणार आहे. इस्लापूर आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करण्यात आले असून शवविच्छेदन अहवालानंतरच नेमके मृत्यूचे कारण स्पष्ट होणार आहे. कुमटी उपकेंद्रांतर्गत लोखंडवाडी हे गाव येते. प्राथमिक आरोग्य केंद्र इस्लापूर हे लोखंडवाडीकरांना सहा कि.मि.वर असून लोखंडवाडी हे गाव शिवणी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कक्षेत येते परंतु बारा कि.मि. लांबपल्लूयावर असल्याचे सांगण्यात आले.

# दोन वर्षांपूर्वी बांधलेला पूल वाहून गेला; विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांची गैरसोय

मुखेड/प्रतिनिधी-मुखेड तालुक्यातील धनज गावात अवघ्या दोन वर्षांपूर्वी बांधण्यात आलेला पूल परवाच्या संततधार पावसामुळे वाहून गेल्याने गावाचा बाहेरील भागाशी असलेला संपर्क तुटला आहे. पुलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने ग्रामस्थांसह शालेय विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत असून, नागरिकांच्या दैनंदिन जीवनावरही परिणाम झाला आहे.

धनज ग्रामपंचायतीच्या हद्दीतील हा पूल दोन वर्षांपूर्वी बांधण्यात आला होता. मात्र, अल्पावधीतच तो कोसळल्याने पुलाच्या बांधकामाच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. पुलाच्या दोन्ही बाजूंचा रस्ता खचला असून, मोठमोठ्या भेगा पडल्या आहेत. त्यामुळे या मार्गावरील वाहतूक पूर्णतः बंद झाली आहे.पुलाच्या नुकसानीमुळे शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच ग्रामस्थांना दैनंदिन कामांसाठी पर्यायी व लांबच्या मार्गाचा वापर करावा लागत आहे.ग्रामस्थांनी या पुलाच्या बांधकामात निकृष्ट दर्जाच्या साहित्याचा वापर झाल्याचा आरोप केला आहे. संबंधित कामाची वरिष्ठ स्तरावर चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच पुलाची तातडीने दुरुस्ती करून वाहतूक पूर्ववत करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. दरम्यान, प्रशासनाने घटनास्थळी पाहणी करून परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना कराव्यात आणि धनज गावाचा तुटलेला संपर्क तातडीने पूर्ववत करावा, अशी मागणीही ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे.




आ.आनंदराव बोंढारकर यांच्या आमदार विकास निधीतून चौफाळा येथील महर्षी मार्कंडेय मंदिर व श्री शनिदेव मंदिर परिसरात पेवर्स ब्लॉक कामाचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी शिवसेना शहरप्रमुख तुलजेश यादव, पद्मशाली समाजाचे अध्यक्ष ओमप्रकाश राखेवार, माजी नगरसेवक सतीश राखेवार, मनोहर चलिन्द्रवार, भगवान पुर्णेकर, धनंजय माडेवार व इतर उपस्थित होते.

# पीपल्स कॉलेजमध्ये लेखन प्रेरणा दिनानिमित्त निबंध स्पर्धा उत्साहात

नांदेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि. २९ जुलै २०२६ च्या परिपत्रकानुसार साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जन्मदिवसानिमित्त लेखन प्रेरणा दिन पीपल्स कॉलेज, नांदेड येथील मराठी विभागातर्फे उत्साहात साजरा करण्यात आला.

या निमित्ताने इयत्ता ११ वी व १२ वी (कला व वाणिज्य) तसेच बी.ए. व बी.कॉम.च्या विद्यार्थ्यांसाठी आजच्या काळात अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याची प्रासंगिकता या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेत एकूण २१ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, विचार आणि सामाजिक कार्याविषयी अभ्यासपूर्ण व उत्कृष्ट निबंध सादर केले. याप्रसंगी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर आधारित माहितीपर भित्तीपत्रकाचे अनावरण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी भित्तीपत्रकाचे अवलोकन करून अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक, सामाजिक व परिवर्तनवादी कार्याची माहिती जाणून घेतली.या कार्यक्रमाचे संयोजन प्रा.डॉ. बालाजी पोतुलवार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विकास सुकाळे, मराठी विभागप्रमुख डॉ. यशपाल भिंगे, डॉ. मथु सावंत, प्रा. कल्पना जाधव, प्रा. प्रतिमा आसले, प्रा. व्यंकटी जाधव, डॉ. सचिन




गिरी तसेच डॉ. संध्या जाधव यांनी सहकार्य व परिश्रम घेतले.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये लेखनकौशल्याला चालना मिळण्याबरोबरच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा समकालीन संदर्भ आणि सामाजिक परिवर्तनातील योगदान नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा उद्देश सफल झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# रिपब्लिकन सेनेच्या लोकसभा अध्यक्षपदी सुनील पाटील चिंचोलकर

उमरखेड/प्रतिनिधी-ओबीसी, वंचित घटकांच्या न्याय-हक्कासाठी झटणारे अभ्यासू व्यक्तिमत्व सुनील पाटील चिंचोलकर यांची रिपब्लिकन सेनेच्या यवतमाळ-वाशिम लोकसभा अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल वीरशैव लिंगायत सकल समाज संघटना, उमरखेडच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.




यावेळी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, चिंचोलकर यांनी राजकीय आणि सामाजिक दोन्ही क्षेत्रात मोलाचे कार्य केले आहे. गोरगरीबांना मदत, आरोग्य व शैक्षणिक शिबिरे आणि तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात त्यांचे मोठे योगदान आहे.सत्काराला उत्तर देताना चिंचोलकर म्हणाले, पद हे केवळ अधिकार नसून जनसेवेची संधी आहे. यवतमाळ-वाशिम क्षेत्रातील नागरिकांच्या हक्कांसाठी आणि विकासासाठी मी कटिबद्ध राहीन.याप्रसंगी संघटनेचे अध्यक्ष रत्नाकर पुजारी, कोषाध्यक्ष प्रकाश दुधेवार, डॉ. विष्णुकांत शिवणकर, बालाजी शिरडकर, मारोती भोकरे, किसन बिच्चेवार यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाच हजाराची गावठी दारु जप्त

नांदेड/प्रतिनिधी-मौजे शिंगारवाडी ता.किनवट येथे पोलीसांनी धाड टाकुन पाच हजार रुपयाची गावठी दारु जप्त केली आहे. मौजे शिंगारवाडी येथे एक महिला गावठी दारु विक्री करीत असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. रविवारी सायंकाळी किनवट पोलीसांनी धाड टाकुन संगीता वसंत पवार (वय ४५) रा.शिंगारवाडी या महिलेस ताब्यात घेतले. तीच्या घरातून पाच हजार रुपयाची गावठी दारु पोलीसांनी जप्त केली.

# सरस्वती महाविद्यालयात लोकमान्य टिळक-अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात

किनवट/प्रतिनिधी-आपल्या विचारातून राष्ट्राभिमान, राष्ट्रप्रेम व राष्ट्रनिष्ठा जगाला देत हा देश अखंड राहिला पाहिजे यासाठी अविरत कष्ट घेणारे थोर क्रांतिकारक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि आपल्या साहित्यातून जगाला मानवतेचा विचार देणारे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा जयंती सोहळा सरस्वती महाविद्यालयात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आनंद भंडारे होते. तर अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.किरण पाईकराव हे उपस्थित होते. प्रथम मान्यवरांसह उपस्थितांनी महापुरुषांना अभिवादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभागाचे प्रमुख डॉ.रामकिशन चाटे यांनी केले.यावेळी प्रो.डॉ.मार्तंड कुलकर्णी यांनी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारावर मौलिक मार्गदर्शन केले. अण्णाभाऊंचा जन्मदिवस महाराष्ट्र शासनाने यावर्षापासून वाचन लेखन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्याचे ठरविले आहे. हा शासनाचा स्तुत्य उपक्रम वर्षभर महाविद्यालयात राबवण्याचा संकल्प प्राचार्य डॉ.आनंद भंडारे यांनी आपल्या अध्यक्षीय समारंभातून व्यक्त केला.प्रथमतः अण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या विचारावर सविस्तर मार्गदर्शन करत आज या मान्यवरांचे विचार राष्ट्राला कसे उपयोगाचे आहे या विषयावर भाष्य केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# पुरासोबत आला १२ फुटाचा महाकाय अजगर;धाडसी युवकांनी दिले जीवनदान

## निचपूरकरांची संरक्षण भिंतीची मागणी पुन्हा ऐरणीवर



किनवट/प्रतिनिधी-सततच्या पावसामुळे जंगलातून निचपूर गावात आलेल्या पुराच्या पाण्यासोबत जवळपास बारा फूट लांबीचा अजगर वाहून आल्याचे ग्रामस्थांना पहायला मिळाले. काहीतरी भक्ष्य गिळल्यामुळे अजगर सुस्तावस्थेत पडून होता. दरम्यान, काही धाडसी युवकांनी प्रसंगावधान राखत अजगराला पकडून तळ्यात सोडून त्याला जीवनदान दिले. पुराचे पाणी रोखण्यासाठी संरक्षण भिंतीचे कठडे उभा करण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करून देण्याची निचपूरकरांची मागणी आहे.

निचपूर गावालगत पहाड आणि घनदाट जंगल तर दुसऱ्या बाजूने पाटबंधारे विभागाचा मध्यम प्रकल्प असल्याने पावसाळा आणि पुरपरिस्थिती दरम्यान अशा सरपटणाऱ्या प्राण्यांच्या प्रमाणात वाढ होत असते. जंगलातून येणारे पुराचे पाणी दरवर्षी गावात घुसत असल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनत असल्याचे सामाजिक कार्यकर्ते महेश मुंडे यांनी सांगितले. यापुर्वी जंगली डुकराच्या दोन वेगवेगळ्या हल्ल्यांत गावालगत एका व्यक्तीचा मृत्यू झाला, तर दुसऱ्या घटनेत एका महिलेला गंभीर दुखापत झाली. अस्वलाच्या हल्ल्याचीही घटना घडली असून त्यामध्ये एका महिलेचा थोडक्यात जीव वाचला होता. मागील वर्षी अंगणवाडी केंद्रात विषारी साप आढळला, गावात दोन ठिकाणी अजगर सापडले, तर गावालगतच्या नाल्यात पाच-सहा ठिकाणी मोठे अजगर दिसला. त्यात अधिकची भर म्हणून २ ऑगस्ट रोजी बारा फुटांचा अजगर गावात आढळला. जंगलातून येणाऱ्या पुराच्या पाण्यामुळे दरवर्षी गावातील अनेक घरांचे नुकसान होते आणि जनजीवन पूर्णपणे विस्कळीत होते. मागील वर्षी बांधण्यात आलेल्या नाल्यांमुळे त्यातून काही प्रमाणात पुराचे पाणी वाहून गेल्याने लोकांनी सुटकेचा निःश्वास टाकलाय. संरक्षण भिंतीचे बांधकाम अद्याप प्रलंबित आहे. हे काम पूर्ण झाल्यास जंगलातील पुराचे पाणी गावात न शिरता गावाबाहेरून वाहून जाईल. त्यामुळे घरांचे नुकसान टाळता येईल. वन्य प्राण्यांचा गावातील प्रवेश मोठ्या प्रमाणात रोखता येईल. भविष्यातील जीवित व वित्तहानी टाळता येईल. यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला असून, तातडीने मंजुरी मिळावी यासाठी निचपूरकरांनी प्रशासनाकडे पाठपुराव्याचे सातत्य राखल्याचे सांगितले.

# महिला कुस्तीपटू विनयभंग प्रकरणात ब्रिजभूषण सिंह निर्दोष

## दिल्ली न्यायालयाचा निकाल



नवी दिल्ली:महिला कुस्तीपटूंच्या विनयभंग प्रकरणात भारतीय जनता पक्षाचे माजी खासदार तथा भारतीय कुस्ती महासंघाचे (डब्ल्यूएफआय) माजी अध्यक्ष ब्रिजभूषण शरण सिंह यांना दिल्लीतील राऊस व्हेन्यू न्यायालयाने सर्व आरोपांतून निर्दोष मुक्त केले. अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी अश्वनी पनवार यांनी सोमवारी हा निकाल सुनावला. सहआरोपी आणि डब्ल्यूएफआयचे माजी सहायक सचिव विनोद तोमर यांचीही न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली.

जानेवारी २०२३ मध्ये सहा महिला कुस्तीपटूंनी ब्रिजभूषण शरण सिंह यांच्यावर लैंगिक छळ, विनयभंग आणि गुन्हेगारी धमकीचे आरोप करत तक्रार दाखल केली होती. या प्रकरणी १,१३३ दिवसांत तब्बल १२७ सुनावण्या पार पडल्या. २ जुलै २०२६ रोजी दोन्ही बाजूंचे अंतिम युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर न्यायालयाने निकाल राखून ठेवला होता.निकालानंतर ब्रिजभूषण शरण सिंह यांनी न्यायालयाचे आभार मानत, न्यायालयाने मला सन्मानाने निर्दोष मुक्त केले आहे. आता या प्रकरणावर अधिक भाष्य करणार नाही, अशी प्रतिक्रिया दिली.या प्रकरणामुळे देशभरात मोठे आंदोलन झाले होते. ऑलिम्पिक पदक विजेते बजरंग पुनिया, विनेश फोगाट आणि साक्षी मलिक यांच्यासह अनेक आघाडीच्या कुस्तीपटूंनी २०२३ मध्ये दिल्लीतील जंतर-मंतरवर आंदोलन छेडले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर दिल्ली पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. अखेर साडेतीन वर्षांच्या न्यायालयीन प्रक्रियेनंतर ब्रिजभूषण शरण सिंह आणि विनोद तोमर यांची सर्व आरोपांतून निर्दोष मुक्तता करण्यात आली.

# अतिवृष्टीग्रस्तांच्या मदतीला धावली मांडवीची तरुणाई

मांडवी/प्रतिनिधी-किनवट तालुक्यातील तेलंगणा सीमेवरील पिंपळगाव फाटा परिसरात २९ व ३० जुलै रोजी झालेल्या मुसळधार अतिवृष्टीमुळे अनेक कुटुंबांचे मोठे आर्थिक व भौतिक नुकसान झाले. या संकटग्रस्त कुटुंबांच्या मदतीसाठी शासकीय सहाय्याची प्रतीक्षा न करता मांडवी परिसरातील तरुणांनी पुढाकार घेत अवघ्या काही तासांत निधी उभारून पूरबाधितांना तात्काळ मदतीचा हात दिला.

अतिवृष्टीमुळे उद्ध्वस्त झालेल्या कुटुंबांची परिस्थिती पाहून युवक शैलेश अविनाश राठोड यांनी 'आपलं गाव' या व्हॉट्सप समूहाच्या माध्यमातून मदतीचे आवाहन केले. त्यांच्या या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत गावातील ४४ युवक एकत्र आले. सर्वांनी ऑनलाइन वर्गणी जमा करून २७ हजार रुपयांचा निधी उभारला. यानंतर युवकांनी पूरग्रस्त कमल गुलाब गुरनुले, माधव राम कांबळे व शंकर भंडारे यांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. संकटग्रस्त कुटुंबांना तात्काळ रोख आर्थिक मदत, जीवनावश्यक रेशन किट तसेच कपड्यांचे वाटप करण्यात आले. या मदतीमुळे बाधित कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला. संकटाच्या काळात सामाजिक बांधिलकी जपत स्थानिक तरुणांनी दाखविलेली तत्परता आणि संवेदनशीलता परिसरासाठी प्रेरणादायी ठरली आहे. या उपक्रमामुळे मांडवी व पिंपळगाव फाटा परिसरात युवकांच्या सामाजिक जाणीवेचे सर्वत्र कौतुक होत असून, नागरिकांनीही या कार्याचे स्वागत केले आहे. या मदत उपक्रमात शैलेश राठोड, शकील सर, आशिष जयस्वाल, सावन राठोड, गजानन बावने, सुरेश सुभाष चव्हाण यांच्यासह अनेक युवकांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

# सिमेंट पाईप व मुरुम टाकून तयार केलेला पुल खचला

## सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामगिरीवर प्रश्न चिन्ह



देगलूर/प्रतिनिधी-सहा महिन्यांपासून पुलाचे काम रखडले असल्यामुळे वझर-शिळवणी रस्त्यावरील बसवण्णा मंदिराजवळील पुलाचे काम गेल्या सहा महिन्यांपासून रखडले असून, याठिकाणी सिमेंट पाईप व मुरूम टाकून तयार करण्यात आलेला रस्ता पावसामुळे पुन्हा खचला आहे. परिणामी हाणेगाव येथून वझर, बोंथी व भवानी दापका मार्गे उदगीरकडे जाणारी उदगीर आगाराची बससेवा अखेर बंद करण्यात आली आहे.

गावकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, पुलाच्या कामासाठी जानेवारी महिन्यात याठिकाणी पाच ते सहा टिप्पर गिट्टी आणून टाकण्यात आली होती. मात्र, प्रत्यक्षात पक्का पूल न बांधता केवळ सिमेंट पाईप व मुरूम टाकून तात्पुरता रस्ता तयार करण्यात आला. आता हा रस्ताच खचल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. पुलाचे बांधकाम करण्यासाठी आणलेली गिट्टी नेमकी कशासाठी टाकण्यात आली? असा सवालही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहायक अभियंता कस्तुरे डी.एम. यांच्याशी संपर्क साधला असता, पूर्वी पूल खचला होता. सिमेंट पाईप व मुरूम टाकून तात्पुरत्या स्वरूपात रस्ता सुरळीत करण्यात आला. नवीन पुलाच्या बांधकामासाठी अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, मंजुरी मिळताच तातडीने काम सुरू करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. संबंधित गुत्तेदाराशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करूनही प्रतिसाद मिळत नाही, दरम्यान, पूल खचल्यामुळे उदगीर आगाराची बससेवा बंद करण्यात आल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. प्रशासनाने याची तातडीने दखल घेऊन पुलाचे काम पूर्ण करून बससेवा पूर्ववत करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# वासरी नदीघाटावर पोलीसांची धाड;एक कोटीचा ऐवज जप्त

नांदेड/प्रतिनिधी-वासरी शिवारातील गोदावरी नदीच्या पात्रातून रेती उपसा करीत असतांना पोलीसांनी धाड टाकुन १ कोटी रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. याप्रकरणी चार जणांविरुध्द मुदखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वासरी शिवारातील गोदावरी नदीच्या पात्रातून रेतीचा अवैध उपसा सुरु असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण व पोलीस कर्मचाऱ्यांनी रविवारी सायंकाळी वासरी घाटावर छापा टाकला. यांत्रीकी पध्दतीने नदीच्या पात्रातून रेतीचा उपसा सुरु असल्याचे आढळून आले. पोलीसांना बघताच रेती उपसा करणारे पळून गेले आहेत. पोलीसांनी घटनास्थळावरुन चार लोखंडी इंजीन बोटी, चार लोखंडी हायपर व २० ब्रास रेती असा १ कोटीचा ऐवज जप्त केला. पोलीसांनी नदी घाटावरच इंजीन बोटी व लोखंडी हायपर पंचासमक्ष जाळून नष्ट केले. या प्रकरणी पोलीसांनी हनुमंत संभाजी पुयड, ज्ञानेश्वर बळीराम पुयड रा.पुणेगाव ता.मुदखेड, दिलीप माधव कांजाळकर, भुजंग रामजी वाहिदे रा. वासरी यांच्या विरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# पोलीसांनी बेपत्ता तरुणी व महिलेचा घेतला शोध

कुंडलवाडी/प्रतिनिधी-कुंडलवाडी पोलीस ठाण्याने सायबर सेलच्या तांत्रिक मदतीने दोन स्वतंत्र प्रकरणांतील बेपत्ता झालेल्या एका तरुणीसह एका महिलेचा शोध घेऊन त्यांना सुखरूप कुटुंबीयांच्या स्वाधीन केले.

कुंडलवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पिंपळगाव (कु) येथील एक तरुणी घरातून निघून गेल्याची तक्रार तिच्या कुटुंबीयांनी पोलीस ठाण्यात दाखल केली होती. तक्रारीची गांभीर्याने दखल घेत उपविभागीय पोलीस अधिकारी दशरथ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांच्या नेतृत्वात तपास सुरू करण्यात आला. सायबर सेलच्या तांत्रिक मदतीने तपासाची चक्रे वेगाने फिरवत संबंधित तरुणीचा ठावठिकाणा शोधण्यात पोलिसांना यश आले. पुणे येथून तिला सुखरूप ताब्यात घेऊन तिच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आले.दरम्यान, कुंडलवाडी शहरातील एका परिसरातून बेपत्ता झालेल्या महिलेच्या प्रकरणातही पोलिसांनी तत्परता दाखवली. तांत्रिक तपासाच्या आधारे संबंधित महिलेचा नांदेड येथे शोध घेण्यात आला. तिला सुरक्षितपणे ताब्यात घेऊन तिच्या पतीच्या स्वाधीन करण्यात आले.ही संपूर्ण कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक निलाभ रोहन, अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील आणि उपविभागीय पोलीस अधिकारी दशरथ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय गिरी यांच्यासह पोलीस कर्मचारी तसेच नांदेड सायबर सेलचे पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते.

# व्यंकटराव वळगे प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त

मुखेड/प्रतिनिधी-बाऱ्हाळी येथील विद्या विकास विद्यालयाचे ज्येष्ठ कर्मचारी, पत्रकार तथा माजी उपसरपंच व्यंकटराव खंडेराव वळगे हे नियत वयोमानानुसार प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. त्या अनुषंगाने भाऊसाहेब देशपांडे मंगल कार्यालय बाऱ्हाळी येथे सेवापूर्ती सत्कार सोहळा कार्यक्रम घेण्यात आला.

विद्या विकास विद्यालय बाऱ्हाळी येथे अनेक वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावत असताना व्यंकटराव खंडेराव वळगे हे दि. ३१ जुलै रोजी सेवानिवृत झाले. त्यांनी विद्यार्थ्यांप्रती, पालकांप्रती तसेच गावकऱ्यांप्रती जिव्हाळ्याचे संबंध जपले. शिस्तप्रिय, कर्तव्यदक्ष आणि मनमिळावू स्वभावामुळे त्यांनी विद्यार्थी, शिक्षक, पालक व नागरिकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण करत आपल्या सेवाकाळात संस्थेच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देऊन शैक्षणिक कार्यात त्यांनी उल्लेखनीय भूमिका बजावली. सध्या बाऱ्हाळी ग्रामपंचायतीचे उपसरपंच म्हणून कार्यरत असून गावाच्या विकासासाठी विविध विकासकामे राबविण्यात त्यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त त्यांचा विविध स्तरांतून सत्कार व गौरव करण्यात आला. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती विजयाताई देशपांडे, माजी आमदार हनमंतराव पाटील बेटमोगरेकर, नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटी जिल्हा उपाध्यक्ष राजन देशपांडे, सरपंच सौ. अंजलीताई देशपांडे, अरुण महाजन, प्राचार्य प्रा. शिरीष लव्हेकर, चेअरमन व्यंकट पाटील उमाटे, आनंद वळगे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पत्रकार बंधू, राजकीय क्षेत्रातील सहकारी आणि ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.




एमपीएससी, एमएचटी-सिईटी परीक्षेतील गैरप्रकाराची चौकशी करावी तसेच टीईटी परीक्षा रद्द करावी व अन्य मागण्यांसाठी संभाजी ब्रिगेड संघटनेच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात विभागीय अध्यक्ष संकेत पाटील, जिल्हाध्यक्ष सुभाष कोल्हे, कमलेश कदम, जेजेराव शिंदे, परमेश्वर पाटील, अशोक कदम, अंकुश कोल्हे व इतर सहभागी झाले होते.

पान १ वरुन

## तीन राज्यांच्या पोटनिवडणुकीत...

वर्षे भाजपचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या या मतदारसंघात जन सुराजच्या विजयामुळे बिहारच्या राजकारणात नव्या समीकरणांची चर्चा सुरू झाली आहे. गुजरातच्या मांजलपूर मतदारसंघात भाजपचे सतीश पटेल यांनी काँग्रेसच्या उमेदवाराचा ३० हजारांहून अधिक मतांनी पराभव करत पक्षाचा गड कायम राखला. या विजयामुळे गुजरातमध्ये भाजपचे वर्चस्व पुन्हा अधोरेखित झाले आहे. मध्य प्रदेशातील दतिया मतदारसंघात काँग्रेसचे घनश्याम सिंह यांनी अटीतटीच्या लढतीत भाजपचे आशुतोष तिवारी यांच्यावर मात केली. मतमोजणी दरम्यान अनेक फेऱ्यांत आघाडी बदलत असली तरी अखेरीस काँग्रेसने ही प्रतिष्ठेची जागा जिंकत भाजपला धक्का दिला. या निकालांमुळे तीन राज्यांतील राजकीय चित्र मिश्र राहिले. भाजपने गुजरातमधील जागा राखण्यात यश मिळवले, काँग्रेसने मध्य प्रदेशात मुसंडी मारली, तर बिहारमध्ये प्रशांत किशोर यांच्या जन सुराज पक्षाने मोठा राजकीय संदेश देत पहिला विधानसभा विजय नोंदवला. आगामी बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बांकीपूरचा निकाल विशेष महत्त्वाचा मानला जात आहे.

## पूरग्रस्तांसाठी केंद्राकडून...

स्तरांतून स्वागत व्हावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.यावेळी त्यांनी विरोधकांवर अप्रत्यक्ष टीका करत, केंद्र सरकारवर सातत्याने टीका करणाऱ्यांनी आता या आर्थिक मदतीचेही स्वागत करावे, असे आवाहन केले. पूरग्रस्तांच्या प्रश्नावर आरोप-प्रत्यारोप करण्यात वेळ घालवण्यापेक्षा पुनर्वसन आणि मदतकार्याला प्राधान्य देणे अधिक आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.देशातील विविध राज्यांमध्ये निर्माण झालेल्या पूरस्थितीवर केंद्र सरकार सातत्याने लक्ष ठेवून असून, परिस्थितीचा आढावा घेऊन आवश्यक त्या राज्यांना वेळेत आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जात असल्याचेही सावंत यांनी सांगितले. प्रभावी आपत्ती व्यवस्थापनासाठी केंद्र आणि राज्य सरकार यांच्यातील समन्वय अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.त्यांच्या मते, या ५०० कोटी रुपयांच्या निधीचा सर्वाधिक लाभ पूराचा फटका बसलेल्या ठाणे, पालघर, रायगड तसेच विदर्भातील अनेक जिल्ह्यांना होणार आहे. या निधीतून तातडीची मदत, बचाव व पुनर्वसन कार्य, नुकसानग्रस्त पायाभूत सुविधांची दुरुस्ती तसेच नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यास मदत मिळणार आहे.

# लिंगी गाव चार दिवसांपासून अंधारात; वीज नसल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर

> महावितरणच्या अधिकाऱ्यांनी लिंगी गावातील या गंभीर समस्येकडे त्वरित लक्ष देऊन वीजपुरवठा पूर्ववत करावा. अन्यथा ग्रामस्थांच्या पाठीशी उभे राहून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.
> - रमेश बद्दीवार (भाजपा जिल्हा ओबीसी चिटणीस, नांदेड)

मांडवी/प्रतिनिधी-किनवट तालुक्यातील लिंगी गावात गेल्या चार दिवसांपासून वीजपुरवठा पूर्णपणे खंडित झाला असून संपूर्ण गाव अंधारात चाचपडत आहे. ग्रामस्थांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना वारंवार विनंती करून आणि तक्रारी देऊनही प्रशासनाने अद्याप याची कोणतीही गंभीर दखल घेतलेली नाही. महावितरणच्या या उदासीन कारभाराबद्दल ग्रामस्थांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.चार दिवसांपासून वीज नसल्यामुळे गावातील पाणीपुरवठा यंत्रणा ठप्प झाली आहे, ज्यामुळे ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागत असून तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. सध्या पावसाचे दिवस असल्याने गावात अंधाराचा फायदा घेऊन साप, विंचू व इतर विषारी प्राणी निघण्याचे प्रमाण वाढले आहे. यामुळे नागरिकांच्या, विशेषतः लहान मुले व वृद्धांच्या जीवितास मोठा धोका निर्माण झाला आहे.अंधारामुळे रात्रीच्या वेळी शालेय विद्यार्थ्यांचे व तरुणांचे अभ्यासाचे मोठे नुकसान होत आहे. आधीच पावसाळ्याचे दिवस आणि त्यात सलग चार दिवस वीज नसल्याने दैनंदिन व्यवहार पूर्णपणे विस्कळीत झाले आहेत.

पान १ वरुन

## 'जेन झी'ची संघाकडून...

हा संवाद होणार आहे. देशभरातील १०० हून अधिक शहरांमधील १५ ते १९ वयोगटातील दोन हजारांहून अधिक हायस्कूल व महाविद्यालयीन विद्यार्थी या परिषदेत सहभागी होणार आहेत. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व, लोकशाही मूल्ये, राष्ट्रनिर्मिती आणि सामाजिक जबाबदारी याविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमात डॉ. भागवत तरुणांशी थेट संवाद साधणार आहेत. देशभरात विद्यार्थ्यांशी संबंधित विविध प्रश्नांवर वातावरण तापलेले असताना हा संवाद महत्त्वाचा मानला जात आहे.२०११ मध्ये ऋषभ शाह यांनी स्थापन केलेल्या आयआयएमयूएन या संस्थेच्या माध्यमातून गेल्या १५ वर्षांपासून युवा नेतृत्व घडविण्याचे काम केले जात असून, या व्यासपीठातून अनेक विद्यार्थी पुढे विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत आहेत.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com मो.९४२२१७४७७४